4 SEP 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉक्टरांनी सामाजिक कार्यात योगदान द्यावे : डॉ. शिर्के

**कसबा बावडा : प्रतिनिधी**

डॉक्टरांनी सामाजिक कार्यात योगदानासाठी वेळ द्यावा, असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या १२ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

डी. वाय. पाटील विद्यापीठाचे गेल्या १२ वर्षांत खूप मोठे योगदान समाजाला दिले आहे. विद्यापीठाच्या कार्यामुळे केवळ देशातच नाही तर आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळवला आहे. शिवाजी विद्यापीठ आणि डी. वाय. पाटील विद्यापीठ यांच्यात करार झाला असून, त्याचा दोन्ही विद्यापीठासाठी येणाऱ्या काळात उपयोग होईल, अशी अपेक्षाही डॉ. शिर्के यांनी व्यक्त केली.

यावेळी सद्‌गुरू गुरूनाथ मुंगळे यांना 'डॉ. डी. वाय. पाटील जीवनगौरव पुरस्कार', डॉ. विनय वाघ यांना 'डॉ. डी. वाय. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार' तर एस.आर. पाटील यांना 'सौ. शांतादेवी डी. पाटील आदर्श सेवक पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांनाही गौरविण्यात आले.




**कसबा बावडा : डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या वर्धापनदिनी गुरुनाथ मुंगळे व डॉ. विनय वाघ यांना पुरस्कार प्रदान करताना डॉ. संजय पाटील, डॉ. डी. टी. शिर्के, ऋतुराज पाटील, डॉ. प्रकाश बेहेरे, डॉ. व्ही.व्ही. भोसले.**

गुरूनाथ मुंगळे म्हणाले, डी. वाय. पाटील हे प्रौढ प्रतापी आहेत. त्यांनी अथक परिश्रमातून शैक्षणिक संकुलाची उभारणी केली आहे. आजवर अनेक पुरस्कार मिळाले आहेत. पण डी.वाय. पाटील विद्यापीठाचा पुरस्कार घरचा असल्याने खास आहे.

डॉ. वाघ म्हणाले, आई व वडील या दोघांनाही जि.प. चा 'आदर्श शिक्षक पुरस्कार' मिळाला आहे. यानंतर मला हा पुरस्कार विद्यापीठाने दिला. याचा मनस्वी आनंद झाला आहे. २७ वर्षांच्या प्रमाणात अनेक गोष्टी शिकलो, शिकवल्या.

कुलगुरू डॉ. प्रकाश बेहरे यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा आपल्या मनोगतामध्ये घेतला. यावेळी विशस्वत ऋतुराज पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. व्ही. भोसले, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शर्मा यांच्यासह मान्यवर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

4 SEP 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉक्टरांनी ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करा

## प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शर्मा यांचे मत : डी. वाय. पाटील विद्यापीठाचा १२ वा वर्धापन दिन

प्रतिनिधी
कसबा, बावडा

डॉक्टर हा समाजातील महत्त्वाचा घटक आहे. त्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शर्मा यांनी केले. डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या १२ व्या वर्धापन दिनाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचा १२ वा वर्धापन दिन उत्साहात पार पडला. सकाळी ९ वाजता संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संस्थेचे विश्वस्त ऋतुराज पाटील, विद्यपीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश बेहरा, अधिष्ठता डॉ. आर. के. शर्मा प्रमुख उपस्थित होते.

यानंतर सभागृहात झालेल्या कार्यक्रमांत डॉ. डी. टी. शर्मा म्हणाले, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाने १२ वर्षे यशस्वी वाटचाल केली आहे. गेल्या दशकात कुशल ज्ञानी डॉक्टर घडवले आहेत. वैद्यकीय व्यवसायाला जगभरात महत्त्व आहे. त्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजासाठी करावा, असे डॉ. शर्मा यांनी प्रतिपादन केले.




कोल्हापूर : जीवन गौरव पुरस्काराने सद्गुरू गुरूनाथ मुगळे यांना सन्मानीत करताना डॉ. संजय डी. पाटील. डावीकडून डॉ. आर. के. शर्मा, ऋतुराज पाटील, प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शर्मा, कुलगुरू डॉ. प्रकाश बेहरा, डॉ. विश्वनाथ भोसले.

कार्यक्रमात संत सद्गुरू गुरूनाथ मुगळे यांना डॉ. डी. वाय. पाटील जीवन गौरव पुरस्काराने गौरवण्यात आले. तर आदर्श शिक्षक म्हणून डॉ. विनय वाघ यांना सन्मानीत करण्यात आले व एस. आर. पाटील यांना सौ. शांतादेवी पाटील आदर्श सेवक म्हणून गौरवण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय पाटील यांचे हस्ते सर्वांना सन्मानीत करण्यात आले. यावेळी डॉ. विनय वाघ व सद्गुरू गुरूनाथ मुगळे यांनी डॉ. डी. वाय पाटील शिक्षण समूहाचे कौतुक केले.

विद्यापीठांतर्गत महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थी, खेळाडू यांना प्रशस्तिपत्र देऊन गौरवण्यात आले. विद्यापीठाचे कुलगुरू प्रकाश बेहरा यांनी विद्यापीठाने गेल्या दशकांत केलेल्या उल्लेखनीय प्रगतीची माहिती आपल्या आध्यक्षीय भाषणात दिली. कार्यक्रमासाठी डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे विविध विभागांचे प्राचार्य प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनी अधिष्ठाता डॉ. आर. के. शर्मा, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले, विश्वस्थ ऋतुराज पाटील उपस्थित होते.

4 SEP 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉक्टरांनी समाजकार्यात झोकून द्यावे

## डॉ. डी. टी. शिर्के : डी. वाय. पाटील विद्यापीठाचा वर्धापनदिन

कसबा बावडा, ता. ३ : डॉक्टर हा देवच आहे. डॉक्टरांनी व्यवसायाबरोबर सामाजिकतेचे भान ठेवून समाजकार्यात झोकून द्यावे, असे उद्गार शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या १२ व्या वर्धापनदिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. कुलपती डॉ. संजय डी. पाटील उपस्थित होते.

या वेळी गुरुनाथ मुंगळे यांना डी. वाय. पाटील जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. डॉ. विनय वाघ यांना डी. वाय. पाटील आदर्श शिक्षक पुरस्कार तर एस. आर. पाटील यांना शांतादेवी पाटील आदर्श सेवक पुरस्कार देवून गौरवण्यात आले.



कोल्हापूर : डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त सद्गुरू गुरुनाथ मुंगळे यांना जीवन गौरव पुरस्काराने गौरवताना डॉ. संजय पाटील. शेजारी ऋतुराज पाटील, डॉ. प्रकाश बेहरे, डॉ. राकेश शर्मा आदी.

डॉ. शिर्के म्हणाले, "गेल्या बारा वर्षात डी. वाय. पाटील विद्यापीठाने देशातच नव्हे तर परदेशातही लौकीक केला आहे. विद्यापीठाच्या वर्धापन दिनाला प्रमुख पाहूणा म्हणून मान मिळणे भाग्याचे आहे. शिवाजी विद्यापीठानेही या विद्यापीठाशी सामंजस्य करार केला आहे."

गुरुनाथ मुंगळे म्हणाले, "डी. वाय. पाटील यांनी अथक परिश्रमातून शिक्षण संस्था उभ्या केल्या, त्या समर्थपणे सांभाळल्याच पण मोठ्याही केल्या. हा पुरस्कार मी घरचा मानतो. इतर पुरस्कारापेक्षा मला या पुरस्काराचे मोल खुप मोठे आहे."

डॉ. विनय वाघ म्हणाले, "शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर मला मिळालेला हा पुरस्कार माझ्या शैक्षणिक कारकिर्दितील महत्वाचा असून मी हा पुरस्कार आई वडिलांना अर्पण करतो."

कुलगुरु डॉ. प्रकाश बेहरे यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा घेतला. या वेळी विश्वस्त ऋतुराज पाटील, कुलसचिव डॉ. विश्वनाथ भोसले, अधिष्ठाता डॉ. राकेश शर्मा, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. जे. एफ. पाटील, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 4 SEP 2017
सकाळ



**कोल्हापूर : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ या विषयावर बोलताना शिवाजी विद्यापीठाचे माजी बीसीयूडी प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे. बसलेले डावीकडून डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील, प्रा. डॉ. वर्षा मैंदर्गी.**

# कमला महाविद्यालयात सेमिनार

कोल्हापूर, ता. २ : कमला महाविद्यालयात 'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६' या विषयावर सेमिनार झाले. ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील अध्यक्षस्थानी होते. शिवाजी विद्यापीठ बीसीयूडीचे माजी संचालक प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. मोरे म्हणाले, 'राज्यातील उच्च शिक्षणाची टक्केवारी २५ टक्क्यांवर न्यायची आहे. नवीन विद्यापीठ कायद्याला गुणवत्तेचा पाया आहे. यामुळे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे २१ व्या शतकात भारत महासत्ता होईल, हे स्वप्न सत्यात येईल.' त्यांनी १८१३ सालापासूनचा देशातील शिक्षण, उच्चशिक्षण, महाविद्यालये, विद्यापीठे यांचा इतिहास सांगितला. डॉ. पाटील म्हणाले, ''नवीन विद्यापीठ कायद्यात विद्यार्थ्यांना प्रतिनिधित्व मिळणार आहे. 'नॅक'ला आजी, माजी विद्यार्थी, पालक शैक्षणिक क्षेत्रातील सहभाग अपेक्षित आहे. आपली शिक्षण प्रणाली टप्प्याटप्प्याने विकसित झाली. डॉ. कर्मवीर आण्णांनी प्राथमिक, माध्यमिक शिक्षणावर प्रथम भर दिला. नंतर महाविद्यालये काढली. आज शिक्षण क्षेत्रात पारदर्शकता येत आहे. विद्यार्थ्यांच्या वतीने शिक्षण प्रणालीचा मागोवा घेतला जात आहे. विद्यापीठात सिनेटच्या रूपाने मुलांना नेतृत्व करता येत आहे. याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा.'' प्रा. डॉ. वर्षा मैंदर्गी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. अनघा पाठक यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. रेखा पंडित यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 SEP 2017
सकाळ



**कोल्हापूर : राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयात 'मानवी हक्क व सामाजिक न्याय' विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा झाली.**

# शाहू महाविद्यालयात कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ३ : राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयात समाजशास्त्र विभागातर्फे 'मानवी हक्क व सामाजिक न्याय' विषयावरील एकदिवसीय कार्यशाळा झाली. शिवाजी विद्यापीठाचे समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. त्यांनी 'मानवी हक्क : भारतीय संदर्भात' या विषयावर प्रमुख भाषण केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे अध्यक्षस्थानी होते. पेठ वडगाव येथील विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्रा. प्रभूदास खाबडे यांनी 'मानवी हक्क, सामाजिक न्या, रूढी' या विषयावर, रामानंदनगर येथील आर्टस्, कॉमर्स, सायन्स महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. व्ही. एम. पाटील यांनी भारतीय 'राज्यघटना व मानवीधिकारा'वर मार्गदर्शन केले. डॉ. पाटील यांनी राज्यघटनेच्या १४ ते ३१ कलमांचे विवेचन केले. कार्तिक कुलकर्णी, प्रा. मनीषा कदम, पूजा पवार, डॉ. सुरेश आपटे यांनी मनोगते मांडली. मराठी विभाग प्रमुख प्रा. सुहास निर्मळे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. राजेंद्र देठे, प्रा. ममता कन्नाडे, प्रा. डॉ. सिंधू आवळे, विविध महाविद्यालयांतील प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 4 SEP 2017

सकाळ

# गतिमान प्रशासनासाठी माहिती तंत्रज्ञान आवश्यक : प्राचार्य डॉ. अमरेंद्र पानी

कोल्हापूर, ता. ३ : विद्यापीठ प्रशासन गतिमान करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजचे प्राचार्य डॉ.अमरेंद्र पानी यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा संगणकशास्त्र अधिविभाग व असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय इमर्जिंग ट्रेंडस् इन इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी इन युनिव्हर्सिटी मॅनेजमेंट विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते.

या वेळी डॉ. पानी यांनी कार्यशाळेची संकल्पना व असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज स्थापनेचा उद्देश स्पषट केला.

डॉ. शिर्के यांनी युजीसीच्या धोरणांनुसार विद्यापीठातील विविध विभागांमध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर चांगल्याप्रकारे होत असल्याचे सांगितले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी बदलत्या काळानुसार संगणकीय ज्ञान आत्मसात करण्याची गरज असल्याचे सांगितले. या प्रसंगी डॉ.जे.एस.बागी, अधिष्ठाता डॉ.पी.एस.पाटील, माजी परीक्षा नियंत्रक डॉ.बी.एम.हिर्डेकर, उपस्थित होते.

4 SEP 2017

Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Vivekananda College celebrates international vulture awareness day

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Vivekanand College celebrated international vulture awareness day with an expert giving a lecture at its campus. The lecture was organised by the zoology department, masters in environmental sciences students and the national cadet corps (NCC) students.

Kiran Shinde, head of department of zoology at the Vivekanand College said that vultures are on the verge of extinction in the country and there is dire need of an awareness campaign.

**CAMPUS BUZZ**

A D Jadhav, professor at the Shivaji University's department of zoology and a member of biodiversity board of the state in his lecture said that vultures are known for eating carrion.

He said that there are around 20 species of vultures around the world. India hosts around 5 species.

One of their characteristic behaviour is to soar in circles using air currents to maintain their flight. He said that vultures have good eye sight.



TOI

The expert underlined the importance of vultures at a lecture

According to Jadhav, their habit of eating carrion is extremely beneficial to humans, as it has a considerable effect on reducing the spread of diseases.

**Yashoda Technical Campus placement:** Campus placement drive at Satara based Yashoda Technical Campus has yielded placement to 30 students from 24 colleges. The placement drive was conducted last week, according to a college official.

According to officials as many as 124 students from 24 colleges had participated in the placement drive, out of which 30 students have been selected. They will be offered appointment letters from the private company soon.

**Panhala-Pawankhind trek:** The Shivaji University, Kolhapur (SUK) will organise the historic Panhala-Pawankhind trek later this month.

The 42km trek has already received the nod from management council last month.

D T Shirke, pro-vice-chancellor of SUK told TOI, "We had received proposal from the National Service Scheme (NSS) authorities to organise such an activity in past.

He added that mainly NSS students will be a part of this activity. It will be organised sometime later this month.

D K Gaikwad, NSS coordinator of the SUK said, "We will only be allowing NSS students from the university and affiliated colleges. If a demand arises we will be allowing other students as well in future. This time 200 students will take part.

He added that Devanand Shinde, vice-chancellor (VC) of SUK, who has been handed the charge of Mumbai University's vice-chancellorship, is not in Kolhapur and the final nod of the overall program will be given by him.

Elaborating on the activity, he said that apart from trekking, students will also be accompanied by experts who will train students in rappelling, ropeway and other adventure activities.